# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-13.06.2026** **वार- शनिवार**

---

**गेमिंग**

पुण्यातील हडपसर आणि फुरसुंगी इथल्या मॉलमध्ये बनावट कॉलसेंटरवर पोलिसांनी छापा मारुन लाखो रुपयांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या टोळीला अटक केली. अमानोरा मॉल इथं दोन आणि फुरसुंगी इथं एक अशा तीन ठिकाणाहून अंदाजे 120 आरोपी बनावट गेमिंग वेबसाईटद्वारे पैसे जिंकण्याचं आमिष दाखवून लोकांकडून पैसे उकळत होते. ऍपेक्स अक्चुअर, जेकेएल इंडिया सोल्युशन अशा नावानं हे कॉल सेंटर सुरु होतं. पोलिसांनी 18 तास छापा कारवाई करुन शेकडो संगणक, हार्डडिस्क, मोबाईल फोन आणि इतर तांत्रिक पुरावे जप्त केले आहेत.

**शाळा**

उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या सर्व शाळा परवा सोमवारी १५ जूनपासून पुन्हा सुरू होणार असून नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांचं उत्साहपूर्ण वातावरणामध्ये स्वागत करण्यासाठी विशेष तयारी करण्यात आली आहे. विशेषतः इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पहिल्याच दिवशी सर्व महापालिका शाळांमध्ये 'शाळा प्रवेश उत्सव' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

पिंपरी-चिंचवडचे महापौर रवि लांडगे,आयुक्त डॉक्टर विजय सुर्यवंशी यांच्यासह पदाधिकारी, नगरसदस्य अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त विविध शाळांना भेट देऊन विद्यार्थ्यांचं स्वागत करणार आहेत. यावेळी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाची उत्साहपूर्ण सुरुवात व्हावी यासाठी ते पालकांशी संवाद साधणार आहेत.

**कामगिरी**

केंद्र शासनाच्या कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयांतर्गत प्रशिक्षण महासंचालनालय यांनी देशभरातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचं श्रेणीकरण जाहीर केलं असून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मोरवाडी इथल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेनं उत्कृष्ट कामगिरीची परंपरा कायम राखत देशपातळीवर मानाचं स्थान मिळविले आहे.

प्रशिक्षण महासंचालनालयानं आयटीआयद्वारे प्रदान केल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाची गुणवत्ता, शैक्षणिक कामगिरी, प्रशिक्षण सुविधा, रोजगाराभिमुखता, संस्थात्मक व्यवस्थापन आणि विविध कार्यक्षमतेच्या निकषांच्या आधारे डेटा-आधारित ग्रेडिंग पद्धती लागू केली आहे. या पद्धतीनुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी डीजीटी एमआयएस पोर्टलवरील माहितीच्या आधारे देशातील सर्व आयटीआयचं मूल्यमापन करण्यात आलं.

**शपथ**

वसुंधरेचं संरक्षण, नैसर्गिक साधनस्रोतांचं जतन आणि शाश्वत जीवनशैलीला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाच्या सातव्या माझी वसुंधरा अभियानाच्या अंतर्गत 'हरित शपथ' या ई-प्रतिज्ञा उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे.

या माध्यमातून नागरिकांनी पर्यावरणपूरक सवयी अंगीकारून वसुंधरा संवर्धनासाठी आपला सहभाग नोंदवावा, असं आवाहन करण्यात आलं आहे.

उपक्रमांतर्गत नागरिकांना माझी वसुंधरेच्या संकेतस्थळावर जाऊन वैयक्तिक अथवा सामूहिक स्वरूपात हरित शपथ घेता येणार आहे. पर्यावरण संरक्षणासाठी घेतलेल्या या ई-प्रतिज्ञा आणि त्यानुसार राबविण्यात आलेल्या कृतींच्या आधारे सहभागी व्यक्ती आणि गटांचं गुणांकन करण्यात येणार आहे.

वृक्षसंवर्धन, जलस्त्रोतांचं जतन, कचरा व्यवस्थापन, ऊर्जा बचत आणि स्वच्छता यांसारख्या उपक्रमांमध्ये नागरिकांचा सहभाग वाढविणं हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे. पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्वीकार करून भावी पिढ्यांसाठी सुरक्षित आणि समृद्ध पर्यावरण निर्माण करण्यासाठी प्रत्येकानं पुढाकार घेणं आवश्यक आहे.

**पुरस्कार**

काँग्रेसचे दिवंगत कार्यकर्ते धनंजय थोरात प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा यंदाचा आदर्श कार्यकर्ता पुरस्कार सामाजिक कार्यकर्ते नामदेव भोसले, मुश्ताक पटेल आणि ज्येष्ठ संगीतकार सलील कुलकर्णी यांना खासदार संजय राऊत यांच्या हस्ते आज पुण्यात प्रदान करण्यात आला. धनंजय थोरात यांच्या आठवणींना उजाळा देताना राऊत यांनी सांगितलं की कुठल्याही अमिषाला ते बळी पडले नाहीत. ते केवळ एकदाच नगरसेवक झाले, तरी पक्षात टिकून राहिले. आज मात्र परिस्थिती अगदी उलटी झाली आहे अशी खंत त्यांनी व्यक्त केली. प्रतिष्ठानचे अध्यक्ष, माजी आमदार मोहन जोशी म्हणाले की गेल्या 18 वर्षांपासून सामाजिक आणि संगीत क्षेत्रात उल्लेखनिय काम करणाऱ्यांना हा पुरस्कार दिला जातो. धनंजय थोरात यांच्यासारखे कार्यकर्ते तयार होण्याची गरज आहे अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

**स्थळ**

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे पुण्यात आयोजित करण्यात येत असलेल्या शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्थळ निश्चित करण्यासाठी साहित्य परिषद, साहित्य महामंडळ, आयोजक संस्था समर्थ युवा फाऊंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी आज तीन स्थळांची पाहणी केली. स्थळ निश्चितीची घोषणा उद्या करण्यात येणार आहे. महाराष्ट्र साहित्य परिषद समर्थ युवा फाऊंडेशनच्या सहकार्यानं शंभरावं साहित्य संमेलन पुण्यात आयोजित करण्यात येत आहे.

**पूरपाहणी**

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड शहरातील मान्सूनपूर्व तयारीला गती देण्यात आली असून, आयुक्त डॉक्टर विजय सूर्यवंशी यांनी विविध नाले आणि नदीपात्राची प्रत्यक्ष पाहणी करून कामांचा आढावा घेतला. नालेस्वच्छतेची कामं वेळेत पूर्ण करून सखल भागात पाणी साचू नये आणि पूरस्थिती टाळण्यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

शिक्षक कॉलनी, पिंपळे निलख परिसरातील मुळा नदीपात्राची पाहणी करताना डॉक्टर सूर्यवंशी यांनी नदी आणि नाल्यांच्या वहनक्षमतेबाबत माहिती घेतली. अतिवृष्टीच्या काळात पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता असलेल्या संभाव्य ठिकाणांची दखल घेऊन तिथं तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याचे निर्देश त्यांनी दिले.

**हवामान**

पुणे आणि परिसरात अद्याप उन्हाचा कडाका आहे. पावसाचा मागमूस नाही.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**